## निशाणी १२ वरील आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचेविरुध्द दिनांक ०३/१०/२०२२ रोजी ''कैफियत नाही'' हा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी केला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचे प्रकरण लोक न्यायालयामध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आले होते. परंतु वादी, प्रतिवादी दरम्यान तडजोड झाली नाही. दरम्यानच्या कालावधीत लेखी कैफियत देण्यासाठीची मुदत संपल्यामुळे प्रतिवादींविरुद्ध कैफियत नाही असा आदेश झाला. प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करायची आहे. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, त्यांनी सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. वादी यांनी अर्जावर म्हणणे देवून प्रतिवादीच्या अर्जाला प्रखर विरोध केलेला आहे. प्रतिवादींना दाव्याचे समंस मिळुन देखील त्यांनी ०९.११.२०२२ पर्यंत लेखी कैफियत दाखल केली नाही. पाच महिन्यांनंतर प्रतिवादींनी त्यांची कैफियत अभिलेखावर दिली आहे. कैफियत मुदतीत का दाखल करता आली नाही याचे कोणतेही संयुक्तीक कारण त्यांनी दिलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा. तसेच अर्ज मंजुर करण्याचा झाल्यास प्रतिवादींकडुन वादीस खर्च मिळावा अशी त्यांनी विनंती केली.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रतिवादीने दि.०९.०६.२०२२ रोजी प्रकरणात हजर झाल्यानंतर त्यांना दि. २३.०६.२०२२, १३.०७.२०२२ व दि. १३.०८.२०२२ पर्यंत कैफियत दाखल करण्यास संधी दिली व दि. १३.०८.२०२२ रोजीच्या लोक न्यायालयामध्ये तडजोड न झाल्यामुळे पुढील तारीख ०३.१०.२०२२ नेमण्यात आली. त्या दिवशी प्रतिवादीतर्फे देण्यात आलेला अर्ज कैफियत देण्यास असणारी कायदेशीर मुदत संपल्यामुळे नामंजुर करण्यात आला व प्रतिवादी विरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत त्यांची कैफियत देखील दिलेली आहे.

५. प्रतिवादी यांचे कथनानुसार प्रस्तुतचे प्रकरण लोक न्यायालयामध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आले होते. परंतु वादी, प्रतिवादी दरम्यान तडजोड झाली नाही. दरम्यानच्या कालावधीत लेखी कैफियत देण्यासाठीची मुदत संपल्यामुळे कैफियत वेळेत दाखल करता आले नाही. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता सदरचा दावा हा कायम स्वरुपी मनाई हुकुम, खरेदी खत रद्द होउन मिळणेबाबत असुन प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडणे गरजेचे आहे. दावा गुणावगुणावर चालणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादीस कैफियत देणेस झालेला उशीर माफ करून कैफियत दाखल करण्यास परवानगी दिल्यास न्यायदानास मदत होणार आहे. मात्र दाव्याच्या कामी जो विलंब झाला आहे तो देखील विचारात घेणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रतिवादीने वादीस खर्च द्यावा असा आदेश केल्यास झालेल्या विलंबांची थोडयाफार प्रमाणात भरपाई होईल असे माझे मत आहे म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

१. अर्ज **नि.१२** मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी वादीस खर्च म्हणून रक्कम रुपये २००/— द्यावेत.

स्वा/—

ठिकाण:—मानोरा.
दि. ०२/०१/२०२३

(श्रीमती. विनया आ. देसाई)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मानोरा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Bench Clerk | :- | B. V. Bhisade |
| Court Name | :- | (Smt. V. A. Desai)<br>(Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Manora. Dist. Washim. |
| Date | :- | 02/01/2023 |
| Order signed by the presiding officer on | :- | 02/01/2023 |
| Order uploaded on | :- | 23/01/2023 |